# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२० २५६५६२३४/२५६५७१७८

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/विसुका/ २०१९/ ५४८० दिनांक :- 30 DEC 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था.

विषय :- राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत आयोजित विभागीय सुसंवाद कार्यक्रमासाठी महाविद्यालयांच्या उपस्थितीबाबत.....

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र २ अ/एडीएम/विसुका/२०१९/९२५ दिनांक २३/१२/२०१९
२. मा.आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, यांचे दिनांक १७/१२/२०१९ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थांना सुचित करण्यात येते की, सीईटी कक्षामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविताना महाविद्यालयांना उद्भवणा-या तांत्रिकी अडचणी/शंका, विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी तसेच संस्थांना सीईटी कक्षाकडून अपेक्षित असणा-या सुधारण समजून घेण्याकरीता विभागीय स्तरावर महाविद्यालयांशी सुसंवाद साधण्याकरीता **"विभागीय सुसंवाद कार्यक्रम"** (Regional Interaction Programme) गुरुवार ०२/०१/२०२० व शुक्रवार ०३/०१/२०२० रोजी सकाळी १०:३० ते दुपारी ०१:३० (प्रथम सत्र) आणि दुपारी ०२:३० ते ०५:३० (द्वितीय सत्र) या दोन सत्रात **बी.जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जे.पी.नारायण रोड,ससुन हॉस्पिटल कंपाऊड,पुणे ४११ ००१** येथे आयोजित करण्यात आला आहे.

संदर्भ क्र १ अन्वये मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मंबई यांनी संदर्भ क्र २ मा. आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत आयोजित विभागीय संसंवाद कार्यक्रमासाठी महाविद्यालयांच्य उपस्थितीबाबत कळविले आहे त्यास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सदर कार्यक्रमा करीता आपल्या संस्थेतील प्रथम सत्रा करीता फक्त प्राचार्य/प्रतिनिधी (१प्रतिनिधी) व दुस-या सत्रा करीता प्राचार्य/प्रतिनिधी (२ प्रतिनिधी ) यांना उपस्थित रहण्याकरीता प्रतिनियुक्त करावे. **सदर कार्यक्रमास मा.आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई हे संबोधीत करणार असल्यामुळे आपल्या संस्थेचा प्रतिनिधी उपस्थित राहील याची आपण दक्षता घ्यावी.**

डॉ.दि.रा.नंदनवार
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

सोबत :- संदर्भीय पत्र

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk2a@ dtemaharashtra.gov.in Intern:http/www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे /तात्काळ

क्र.२अ/एडीएम/विसुका/२०१९/९२५
दि. 23 DEC 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई /पुणे

विषय : राज्य सामाईक प्रवेश परक्षिा कक्षामार्फत आयोजित विभागीय सुसंवाद कार्यक्रमासाठी महाविद्यालयांच्या उपस्थितीबाबत.

संदर्भ : मा.आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, यांचे दि. १७.१२.२०१९ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन पत्राची ईमेलद्वारे प्राप्त झालेली प्रत सहपत्रांसह आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीकरीता सोबत जोडण्यात येत आहे. कृपया पहावी.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सीईटी कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविताना महाविद्यालयांना प्रत्यक्षात उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी/ शंका, विदयार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तसेच संसथांना सीईटी कक्षाकडून अपेक्षित असणाऱ्या सुधारणा समजून घेण्याकरीता विभागीय स्तरावर महाविद्यालयांशी सुसंवाद साधण्याकरीता "विभागीय सुसंवाद कार्यक्रम" (Regional Interaction Programme) दि.०२.०१.२०२० व ०३.०१.२०२० तसेच दि.०६.०१.२०२० व ०७.०१.२०२० रोजी पुणे व मुंबई येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

तसेच मा.आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, यांनी सूचित केल्यानुसार कळविण्यात येते की, संबंधित विभागीय कार्यालयाने सदर कार्यक्रमाचे विभागिय समन्वयक म्हणून काम पहावे व आपलया विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हयातील सर्व संबंधित संस्थेचे प्राचार्य / प्रतिनीधी यांना सदर कार्यक्रमास वेळीच उपस्थित राहण्याकरीता कळविण्यात यावे.

त्याचप्रमाणे दि.०२.०१.२०२० रोजीच्या प्रथम सत्राच्या कार्यक्रमाकरीता बैठकीची आसनक्षमता विचारात घेऊन प्रत्येक महाविद्यालयातील फक्त १ सदस्य / प्रतिनीधी याप्रमाणे उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे. उर्वरीत कार्यक्रमांकरीता प्रत्येक महाविद्यालयातील २ प्रतिनीधी याप्रमाणे उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : माहितीकरीता सादर
मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१

महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ – २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.रासीक/प्र.क्र. /विभा.सुसं.कार्य./महा.उपस्थिती/९०७२ दिनांक२६/१२/२०१९

प्रति,
संचालक तथा नोडल अधिकारी,
तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/कला शिक्षण/आयुष शिक्षण/
वैद्यकीय शिक्षण/मत्स्य व दुग्ध आणि कृषी शिक्षण
महाराष्ट्र राज्य

विषय :- राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत आयोजित विभागीय सुसंवाद कार्यक्रमासाठी आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांच्या उपस्थितीबाबत...

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अन्वये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची स्थापना झाली. सदर अधिनियमातील नमुद तरतुदीनूसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षा आणि केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात.

सीईटी कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबवितांना महाविद्यालयांना प्रत्यक्षात उद्‌भवणाऱ्या तांत्रिक अडचणी/शंका, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तसेच संस्थांना सीईटी कक्षाकडून अपेक्षित असणाऱ्या सुधारणा समजून घेण्याकरीता विभागीय स्तरावर महाविद्यालयांशी सुसंवाद साधने आवश्यक वाटते, जेणेकरुन सीईटी कक्षाकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया आणखी सुलभ रित्या पार पाडता येईल. या कार्यक्रमात जास्तीत जास्त वेळ संस्थांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधण्यासाठी दिला आहे. प्रतिनिधींनी आपल्या अडचणी नमुद करणे व त्यावर उपाय सूचविणे या सूसंवादा दरम्यान अपेक्षित आहे.

या अनुषंगाने,

१) गुरुवार दिनांक ०२/०१/२०२० आणि शुक्रवार दिनांक ०३/०१/२०२० रोजी सकाळी १०:३० ते दुपारी ०१:३० (प्रथम सत्र) आणि दुपारी ०२:३० ते दुपारी ०५:३० (व्दितीय सत्र) या दोन सत्रात बी.जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जे.पी.नारायण रोड, ससुन हॉस्पिटल कंपाऊड, पुणे – ४११ ००१

२) सोमवार दिनांक ०६/०१/२०२० आणि मंगळवार दिनांक ०७/०१/२०२० रोजी सकाळी १०:३० ते दुपारी ०१:३० (प्रथम सत्र) आणि दुपारी ०२:३० ते दुपारी ०५:३० (व्दितीय सत्र) या दोन सत्रात सिडनॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इकॉनॉमिक, बी-रोड, चर्चगेड, मुंबई ४०० ०२० येथे

"विभागीय सुसंवाद कार्यक्रम" (Regional Interaction Programme) आयोजीत करण्यात आला आहे.

सोबत जोडलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार तंत्रशिक्षण विभागाकरीता दिनांक ०२/०१/२०२० रोजी दोन सत्रात व उच्च शिक्षण विभागाकरीता दिनांक ०३/०१/२०२० रोजी प्रथम सत्र तर

कला शिक्षण, आयुष शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मत्स व दुग्ध आणि कृपी शिक्षण या विभागाकरीता व्दितीय सत्राचे नियोजन करण्यात आले आहे.

तसेच दिनांक ०६/०१/२०२० रोजी तंत्रशिक्षण विभागाकरीता दोन सत्रात व उच्च शिक्षण विभागाकरीता दिनांक ०७/०१/२०२० रोजी प्रथम सत्र तर कला शिक्षण, आयुष शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मत्स व दुग्ध आणि कृषी शिक्षण या विभागाकरीता व्दितीय सत्राचे नियोजन करण्यात आले आहे.

वेळापत्रकानुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या प्रतिनिधींशी सवाद साधने शक्य होणार नाही, तेव्हा महाविद्यालय प्रतिनिधींनी त्यांना व विद्यार्थ्यांना उदभवलेल्या अडचणी/शंका/तक्रारी/सूचना सोबत जोडलेल्या अभिप्रायामध्ये (Feedback Form) भरुन आणाव्यात व कार्यक्रम स्थळावरील नोंदणी कक्षाकडे (Registration Desk) सादर कराव्यात, जेणेकरुन सीईटी कक्षास प्राप्त अभिप्रायांवर (Feedback) सविस्तर अभ्यास करुन समाधानकारक उपाय शोधता येईल.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, खालील तक्त्यात विभागनिहाय जिल्ह्यांची यादी दिलेली आहे. सदर तक्त्यानुसार ज्या जिल्ह्याच्या अंतर्गत आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालये येतात, अशा सर्व महाविद्यालयांना सोबत जोडण्यात आलेल्या कार्यक्रम पत्रीकेनुसार उक्त नमुद कार्यक्रमास निश्चित वेळेत उपस्थित राहण्यासाठी आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

पुणे व मुंबई विभागात येणारे जिल्हे

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हाचे नाव | | |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | १) पुणे | २) कोल्हापूर | ३) सातारा |
| | | ४) सोलापूर | ५) सांगली | |
| २ | मुंबई | १) मुंबई | २) ठाणे | ३) रायगड |
| | | ४) रत्नागिरी | ५) सिंधुदूर्ग | ६) पालघर |

संबंधित महाविद्यालयातील प्रतिनिधी सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी स्वत:च्या वाहनाने प्रवास करत असतील तर त्याठिकाणी वाहनतळ (Parking) सुविधा उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविण्यात यावे. (वाहनतळ सुविधा रेल्वे स्थानक, बस स्थानक तसेच महानगरपालिकेची Pay and Parking सुविधा कार्यक्रम स्थळापासून नजीकच्या अंतरावर उपलब्ध आहे.)

सदर कार्यक्रमाकरीता विभागीय समन्वयक म्हणून आपल्या संचालनालयाचे विभागनिहाय सहसंचालक यांनी काम पहावे यानुसार आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

(संदीप कदम) भाप्रसे
आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत - १) कार्यक्रम पत्रीका
२) अभिप्राय (Feedback Form)

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीसाठी सादर,
१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
३) मा.सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विकास, मंत्रालय, मुंबई
४) मा.अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

ADMISSION REGULATING AUTHORITY

&

STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MUMBAI

8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Marg, Fort, Near CSMT, Mumbai – 400 001 (M.S.)

**Regional Interaction Programme for Centralized Admission Process : A.Y 2020-21 of All Professional Courses (PUNE REGION)**

**DATE :**
**(Thursday - 02 January 2020 )**

**VENUE :**
**M.G. Auditorium**
**B.J. Medical College & Sasoon Hospital**
**Jai Prakash Narayan Road, Railway Station Rd,**
**Pune, Maharashtra 411001**

DEPT. OF TECHNICAL EDUCATION -UNDERGRADUATE COURSE (453 Colleges)
SESSION I- TIME- 10.30 Am to 1.30 Pm.

| Sr. No. | Time | Sessionwise Activity Schedule |
|---|---|---|
| 1 | 10.00 to 10.30 am | Course wise / Districtwise Registration (All participants ) at Registration Desk |
| 2 | 10.30. to 10.35 am | INTRODUCTORY SPEECH<br>(Exam Coordinator - Tech.Edn. Dept.) |
| 3 | 10.35 to 10.40 am | WELCOME SPEECH<br>Honble. Commissioner STATE CET CELL |
| 4 | 10.40 to 10.50 Am | Presentation On CAP PROCESS (Exam Coordinator & O.S.D. -Technical Edn.) |
| 5 | 10.50 to 01.15 Pm | Interactions with college / Institute Representatives<br>( Discussion with ARA members / Directors ) & Respective Exam Coordinators |
| 6 | 01.15 to 1.25 Pm | PRESIDENTIAL ADDRESS<br>Honble. Chairperson - Admission Regulating Authority |
| 7 | 1.25 Pm to 1.30 Pm | vote of Thanks |

DEPT. OF TECHNICAL EDUCATION -POSTGRADUATE COURSE (306 Colleges)
SESSION II- TIME- 02.30 Pm.to 5.30 Pm.

| Sr. No. | Time | Sessionwise Activity Schedule |
|---|---|---|
| 1 | 2.00 to 02.30 Pm | Course wise / Districtwise Registration (All participants ) at Registration Desk |
| 2 | 2.30. to 02.35 Pm | INTRODUCTORY SPEECH<br>(Exam Coordinator - Tech.Edn. Dept.) |
| 3 | 2.35 to 02.40 Pm | WELCOME SPEECH<br>Honble. Commissioner STATE CET CELL |
| 4 | 2.40 to 02.50 Pm | Presentation On CAP PROCESS (Exam Coordinator & O.S.D. -Technical Edn.) |
| 5 | 2.50 to 5.15 Pm | Interactions with college / Institute Representatives<br>( Discussion with ARA members / Directors ) & Respective Exam Coordinators |
| 6 | 5.15 to 5.25 pm | PRESIDENTIAL ADDRESS<br>Honble. Chairperson - Admission Regulating Authority |
| 7 | 5.25 to 5.30 Pm | vote of Thanks |

ADMISSION REGULATING AUTHORITY

&

STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MUMBAI

8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Marg, Fort, Near CSMT, Mumbai – 400 001 (M.S.)

Regional Interaction Programme for Centralized Admission Process : A.Y. 2020-21 of All Professional Courses

## FEEDBACK FORM

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of Department (Tick the appropriate) | DEPT. OF TECHNICAL EDUCATION / HIGHER EDUCATION /ARTS / AYUSH / MEDICAL / FISHERY / AGRICULTURE EDN. |
| 2 | Name of Course | |
| 3 | Name of College with College Code | |
| 4 | Address of College | |
| 5 | Name of Principal / Management Head of the College | |
| 6 | Name and Designation of Participant | |
| 7 | Official Email ID | |
| 8 | Mobile No. | |
| 9 | Suggested Solution related to Institute's Problem during Centralized Admission Process (Max 100 words) | 1 \| Problem : |
| | | 2 \| Suggested Solution : |
| 10 | Suggested Solution related to Student's Problem during Centralized Admission Process (Max 100 words) | 1 \| Problem : |
| | | 2 \| Suggested Solution : |
| 11 | Signature and Date | |

Note - ( Kindly submit at Registration Desk of Venue )